म.वि.स./अ.वि./९५८/२०२३
विधानभवन, मुंबई.
दि. : 20/02/2023

: : परिपत्रक : :

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना मा. प्रधान सचिव यांच्या निर्देशानुसार कळविण्यात येते की, विधानभवन हि मुंबईतील एक बहुमजली उंच व प्रतिष्ठीत अशी इमारत आहे. या इमारतीमध्ये आगीची अनुचित घटना घडू नये म्हणून घ्यावयाची काळजी, आग प्रतिबंधक उपाय आणि आगीची एखादी घटना घडल्यास काय करावे किंवा काय करू नये याची माहिती या कार्यालयातील अधिकारी /कर्मचारी व सर्व संबधितांना असणे आवश्यक आहे. उक्त प्रसंगी करावयाच्या कार्यवाहीबाबत खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत. या सूचनांचे काटेकोरपणे पालन करून सहकार्य करावे अशी सर्वांना विनंती करण्यात येत आहे.

**आग प्रतिबंधक उपाय : -**

१. इमारतीमध्ये धुम्रपान करू नये. तसेच इमारतीमध्ये पूर्व परवानगी शिवाय ज्वलन शिल पदार्थांचा वापर करू नये.

२. कार्यालय सोडतांना विजेचे दिवे, पंखे, वातानुकुलीत यंत्रणा व संगणक बंद करण्यात यावेत. ज्यामुळे विद्युत बचत करणे शक्य होईल.

३. कक्षातील कागदपत्रे, कपाट, racks, इ व विद्युत स्वीच बोर्ड यामध्ये सुरक्षित अंतर ठेवावे

४. सामाईक छन्न मार्गात जिन्यात आणि इमारतीत सज्जावर रद्दी, लाकडी सामान, आदी वस्तू ठेवून मार्ग अडवून ठेवू नये. आपत्ती कालावधीत सदर जिने व छन्न मार्ग हे सुरक्षित पणे बाहेर पडण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात.

५. विजेच्या सर्किटवर अधिक विद्युत भार देऊ नये आणि एका खोबणीत एका योग्य क्षमतेचा विद्युत यंत्राचा वापर करावा.

६. विद्युत उपकरणांचा काळजी पूर्वक वापर करावा.

७. उद्वाहनाचा नमूद क्षमतेपेक्षा अधिक लोकांनी एकाच वेळी वापर करू नये.

८. इमारती बाहेर पडणारया मार्गाच्या रचनेची, जिने व राशिपाताची जागा माहिती असावी.

९. उपहारगृहातील स्वयंपाक इंधन वायूचा वापर झाल्यावर Main Valve बंद करावेत.

१०. इमारतीतील व्यवस्था करण्यात आलेल्या अग्निशमन उपकरणाची व प्रसंगी उपकरणे वापरण्याची माहिती आपल्यास देण्यास अग्निशमन विभाग आपल्या सेवेत कायम उपलब्ध आहे.

११. अग्निशमन विभागाचे दूरध्वनी विस्तार क्र. १०१६ संपर्क करण्यात यावा.

१२. इमारत खाली करण्याच्या कवायतीचा नेहमी सराव करावा.

१३. इमारतीच्या आवारात ज्वलनशील पदार्थ विनापरवानगी आणण्यात येऊ नयेत.

१४. अग्निशमन विभागाकडून वेळोवेळी मिळणाऱ्या सूचनांचे पालन करावे.

**आग लागल्यास काय करावे : -**

१. शांत राहून फ्लोअर मार्शलचा सल्ला घ्यावा व त्यानुसार कृती करावी.

२. अग्निशमन विभागाला खबर द्यावी.

३. आग लागलेल्या परिसरातील लोकांना सावध करावे.

४. नजीकच्या जिन्यावरून तळमजल्यावर खाली यावे व इमारतीच्या आवारात मोकळ्या जागेत जमा व्हावे.

५. जिन्यांवरून येतात भिंत व रेलिंगच्या आधाराने दोन ओळींमध्ये शिस्तीने खाली उतरावे.

६. मजल्यावरील छन्न मार्गातील व जिन्या जवळील अग्निरोधक दरवाजे बंद करावेत.

७. धुरातून रांगत मार्गक्रमण करावे.

८. अग्निशमन विभागाकडून ध्वनिक्षेपण यंत्रणेमार्फत मिळणाऱ्या सूचनांचे पालन करावे.

९. उद्वानामध्ये अडकले असाल तर उद्वाहनामधून अग्निशमन केंद्राशी संपर्क साधावा.
**(हूटर साठी #0 दाबावे व अग्निशमन विभागाकरिता २०० डायल करावे.)**

१०. अग्निशमन कर्मचारी वर्गास त्यांच्या कार्यात आवश्यक ते सहकार्य करावे.

**आग लागल्यास काय करू नये :-**

१. भयभीत होऊन भीतीने घाबरून जाऊ नये व सैरावैरा पळू नये.

२. इमारतीतून खाली येण्यासाठी उद्वाहनाचा वापर करू नये.

३. वैयक्तिक साहित्य जमा करण्यात वेळ वाया घालवू नये.

४. छन्न मार्गातील अग्निरोधक दरवाजे उघडे ठेवू नये.

५. प्रसाधनगृहाचा किंवा स्वच्चतागृहाचा आश्रय घेवू नये.

६. गैरवाजवी धोका पत्करू नये.

७. इमारतीच्या छतावर जाण्याचा प्रयत्न करू नये.

८. इमारतीतील अग्निशमन उपकरणांची छेडछाड करू नये.

(बाळासाहेब पाटील)
समादेशक अधिकारी (अग्निशमन)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

१. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी वर्ग.

२. विधानभवन परिसरातील सा.बा. विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी वर्ग.

३. विधानभवन परिसरातील सर्व पक्ष कार्यालये / उपहार गृहातील सर्व कर्मचारी.